चंद्रपूर जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ ,चंद्रपूर
सहायक कामगार आयुक्त यांचे कार्यालय,
प्रशासकिय भवन, ,चंद्रपूर
दिनांक :- ०३.०८.२०२३

## -: आदेश :-

**विषय:- सुरक्षा रक्षक मंडळातील नोंदीत सुरक्षा रक्षक / सुरक्षा पर्यवेक्षक/सुरक्षा अधिकारी यांचे विशेष भत्ता/महागाई भत्ता आणि इतर भत्ते या मध्ये दि.०१.०७.२०२३ ते ३१.१२.२०२३ पर्यंत करण्यात आलेली निश्चिती.**

चंद्रपूर जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळाने चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यातील मंडळात नोंदीत आलेल्या सुरक्षा रक्षक /सुरक्षा पर्यवेक्षक/सुरक्षा अधिकारी यांच्यासाठी दि. ०१.०७.२०२३ ते ३१.१२.२०२३ या कालावधीकरिता विशेष महागाई भत्ता /महागाई भत्ता आणि इतर भत्ते शासनाच्या धोरणाप्रमाणे वेळोवेळी होणारे बदल गृहीत धरून निर्धारित केलेले आहे.

सक्षम प्राधिकारी किमान वेतन अधिनियम १९४८ यांनी आदेश क्र.ग्रा.वि/किवेअ/विभ/२०२२-(२)/कार्या-१०/२१८३६ दि.०१.०७.२०२२ अन्वये दि. ०१.०१.२०२३ ते ३१.१२.२०२३ या कालावधीकरिता विशेष भत्ता /महागाई भत्त्याचा दर रुपये २,४४४/- दरमहा निश्चित केलेला आहे .त्या अनुषंगाने मंडळाने दि. ०३.०८.२०२३ रोजी निर्णय घेऊन मंडळाकडे नोंदीत सुरक्षा रक्षक /सुरक्षा पर्यवेक्षक/सुरक्षा अधिकारी यांचे विशेष भत्ता/महागाई भत्ता दि.०१.०७.२०२३ ते ३१.१२.२०२३ या कालावधी करिता रुपये २,६७८ दरमहा निश्चित केलेला आहे.

विशेष भत्ता दि.**०१.०७.२०२३** ते **३१.१२.२०२३** या कालावधी करिता वेतन व भत्ते यांचा तक्ता.

| अक्र. | हुद्दा | मूळ वेतन | विशेष महागाई भत्ता | घरभाडे भत्ता | प्रवास भत्ता | धुलाई भत्ता | शैक्षणिक भत्ता | एकूण वेतन व भत्ते |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सुरक्षा रक्षक | ११,२३४ | २,६७८/- | १,३९१/- | ६००/- | ६००/- | ६००/- | १७,१०३/- |
| २ | सुरक्षा पर्यवेक्षक | १२,०६९ | २,६७८/- | १,४७४/- | ६००/- | ६००/- | ६००/- | १८,०२१/- |
| ३ | सुरक्षा अधिकारी | १२,८४५ | २,६७८/- | १,५५२/- | ६००/- | ६००/- | ६००/- | १८,८७५/- |

नोंदीत सुरक्षा रक्षकांच्या वेतनावर (मुळ वेतन + विशेष भत्ता (महागाई भत्ता) किमान वेतन) मुख्य मालकांने ४३ टक्के दराने लेव्ही देणे बंधनकारक राहील. नोंदीत सुरक्षा रक्षकाच्या अतीकालीन कामाचा मोबदला किमान वेतनाच्या (मुळ वेतन + विशेष भत्ता (महागाई भत्ता) किमान वेतन) दुप्पट दराने देय राहील. सर्व आस्थापनांनी नोंदीत सुरक्षा रक्षकांचे दि. ०१.०७.२०२३ पासुन वेतन, भत्ते व त्यावरील लेव्ही वरीलप्रमाणे दर्शविण्यात आलेल्या दराप्रमाणे मंडळाकडे निर्धारित वेळेत जमा करावेत, याबाबत शासन तसेच मा. कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे मार्फत वेळोवेळी प्राप्त होणारे निर्देश/आदेश आपणांस कळविण्यात येतील व ते आपणावर बंधनकारक राहील.

(एम.पी .मडावी )
अध्यक्ष
सुरक्षा रक्षक मंडळ
तथा सहायक कामगार आयुक्त, चंद्रपुर

2023/8/4 15:09